| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | **विभागीय शिक्षण उपसंचालक,**<br>पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,<br>१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१ | w'site : www.dydepune.com<br>e-mail :11thonlineadmissiondydpune@gmail.com<br>Phone : (020) 26122217 |


## पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१९-२०
## प्रसिध्दी निवेदन दि.०८.०८.२०१९

********

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी प्रवेशाच्या तीन फे-या पुर्ण झालेल्या आहेत.

तिस-या गुणवत्ता यादीतील कॉलेज ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश घेण्यासाठी दि.०५.०८.२०१९ अखेर सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत वेळ देण्यात आलेली होती , परंतु मुंबई व पुणे विभागातील अतिवृष्टीमुळे प्रवेश घेण्यासाठी दि.०८.०८.२०१९ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत संधी देण्यात आलेली होती. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन प्रवेश घेतलेला आहे.

विशेष फेरी दि.०९.०८.२०१९ ते १९.०८.२०१९ या कालावधीत होणार आहे, त्याचे विस्तारीत वेळापत्रक या प्रसिध्दीनिवेदनात दिलेले आहे.

तिस-या गुणवत्ता यादीची प्रवेशाबाबतची माहिती खालील प्रमाणेः-

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | प्रवेश दिलेल्या (ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या) | १५८५१ |
| २ | प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | ८५७० |
| ३ | प्रवेश नाकारलेले (Rejected) केलेले विद्यार्थी संख्या | २४ |
| ४ | प्रवेश रद्द (Cancelled) केलेले विद्यार्थी संख्या | ७७ |
| ५ | प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | ७१८० |

Scanned by CamScanner

## विशेष फेरीसाठी वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | प्रवेश प्रक्रियेबाबत तपाशिल |
|---|---|---|---|
| १ | ०९.०८.२०१९ | सकाळी १०.०० वाजता | विशेष फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील ऑनलाईन प्रदर्शित करण्यात येईल. |
| २ | दि.०९.०८.२०१९ ते दि.१०.०८.२०१९ | सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत | ऑनलाई प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरुन पूर्ण करणे. विशेष गुणवत्ता यादीमध्ये खालील प्रकारचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील.<br>१) यापूर्वीच्या फे-यांमध्ये प्रवेश न घेतलेले (Not Admitted).<br>२) यापूर्वीच्या फे-यांमध्ये प्रवेश नाकारलेले (Rejected).<br>३) यापूर्वीच्या फे-यांमध्ये प्रवेशासाठी न गेलेले (Not Reported).<br>४) यापूर्वीच्या फे-यांमध्ये कोणतेही कनिष्ठ महाविद्यालय अ‍ॅलॉट न झालेले (Not Alloted).<br>५) यापूर्वीच्या फे-यांमध्ये विद्यार्थ्यांला पहिल्या पसंतीक्रमाचे कनिष्ठ महाविद्यालय मिळाले होते पण प्रवेश न घेतलेले (First Preference but blocked students).<br>६) यापूर्वीच्या फे-यांमध्ये प्रवेश रद्द केलेले (Cancelled ) (कोटा व केंद्रीय प्रवेश प्रक्रिया) |
| ३ | दि.१४.०८.२०१९ | सायंकाळी ५.०० वाजता | विशेष फेरी ची गुणवत्ता यादी ऑनलाईन प्रदर्शित करण्यात येईल. |
| ४ | दि.१६.०८.२०१९ व दि.१९.०८.२०१९ | सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ऑनलाईनद्वारे अ‍ॅलॉट झालेल्या विद्यार्थ्यांनी संबधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रत्यक्ष जाऊन आपला प्रवेश ऑनलाईन निश्चित करुन घ्यावा. |

**प्रवेश अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरतांना करावयाची कार्यवाही :-**

- इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या pune.11thadmission.net या संकेतस्थळावर जावून विद्यार्थ्यांने (Student login) मध्ये जावून पुर्वीचाच लॉगइन आयडी व पासवर्ड टाकावा. शाखा बदल, माध्यम बदल व कनिष्ठ महाविद्यालयाचा पसंतीक्रम बदल करता येईल.
- त्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना Centralized Quota प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंतीक्रम बदल करावयाचा असल्यास किंवा नवीन समाविष्ट करावयाचा असल्यास (My Status) मधील क्रमांक-५ (Centralized Quota Choice Filling Status) समोरील (Filled / Edit Your Chioces) या वरच क्लिक करावे. त्यानंतर (Centralized Quota Choice Filling Status)) ही विंडो दिसेल. त्यानंतर आवश्यक असलेले कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव अंतिम करुन (Save) या बटनावर क्लिक करावे.
- महत्त्वाची सूचनाः- पसंतीक्रम भाग-२ बदल करण्यापुर्वी क्र-६ शेवटचा (Print Form) समोरील (Print Registration Form Part-२) यावर चुकूनही विद्यार्थ्यांने क्लिक करु नये. यावर क्लिक केल्यास जो फॉर्म प्रथम फेरीसाठी पसंतीक्रम होता तोच पसंतीक्रम लॉक होईल. व बदल करता येणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना दुस-या फेरीसाठी कोणताही बदल करता येणार नाही. लॉक झालेला फॉर्म अंतिम समजण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
- आपला फॉर्म पुढील फेरीसाठी ऑनलाईन जमा होईल.
- जर आपणांस प्रिन्ट हवी असेल तरच (Ok) वर क्लिक केल्यानंतर (My Profile) हे पेज दिसेल. त्याखाली (My Status) मधील अ.क्र.६ शेवटचा (Print Form) समोरील (Print Registration Form Part-II) क्लिक करावे .



Scanned by CamScanner

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या www.dydepune.com व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या http://pune.11thadmission.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मिनाक्षी राऊत)
अध्यक्ष
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

Scanned by CamScanner